<u>**महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण.**</u>

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ,
दिनांक : २३ सप्टेंबर, २०११

**<u>वाचा</u> :** १) केंद्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाचे कार्यालयीन ज्ञापन क्र.१३०२४/१/२००८ - टीआरजी-१, दि.५.९.२००८
२) यशदा या संस्थेचे अ.शा.पत्र क्र.बीओएसटी-एडीएम/२०११/एसटीपी, दि.६.४.२०११

**<u>प्रस्तावना</u> :** राज्य शासन सेवेत सर्व स्तरावर कार्यक्षमता वाढवून गतिमान प्रशासन होण्याकरिता राज्यातील सर्व कर्मचारीवृंद यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय व तांत्रिक बदलांमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांना सामोरे जाणे व प्रशासनामध्ये बदलासाठी आवश्यक असणारी लवचिकता साध्य करणे यासाठी देखील सर्व स्तरावर प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. सध्या प्रशिक्षण देण्याचे कार्य विविध स्तरावर असल्याने, त्यामध्ये एकसूत्रता आणून सध्याच्या प्रशिक्षण संस्था अद्ययावत करणे आवश्यक आहे. यादृष्टीने महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण ठरविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

राज्य प्रशिक्षण धोरणाच्या मध्यवर्ती कल्पनेत खालील बाबी समाविष्ट आहेत- सर्वांसाठी प्रशिक्षण असेल, प्रशिक्षण निरंतर दिले जाईल, गरजांवर आधारित प्रशिक्षण देण्यात येईल, राज्याच्या मानव संसाधन विकासाबरोबर प्रशिक्षण जोडले जाईल, सध्या अस्तित्वात असलेल्या प्रशिक्षण सोयीसुविधांचे बळकटीकरण व योग्य वापर करण्यात येईल. यशदा ही शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून कार्यरत राहील, राज्यातील सर्व प्रशिक्षण संस्था यशदाला संलग्न असतील, आवश्यकतेनुसार राज्य, विभागिय व जिल्हा प्रशिक्षण संस्थांची निर्मिती करणे, सर्व प्रशिक्षण संस्थांना स्वायत्तता देणे, विभाग ते कार्यालय स्तरापर्यंत प्रशिक्षण व्यवस्थापकांची नेमणुक करणे, प्रशिक्षणाला अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा नियमांशी निगडीत करणे, प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यासंदर्भातील आराखडा तयार करणे व आराखडयावर आधारित प्रशिक्षणासाठी अर्थसंल्कपीय तरतूद करणे. प्रशिक्षण धोरण योजना ही योजनांतर्गत योजना म्हणून राबविणे. महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरणासंबंधाने शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय :</u>**

**१. प्रशिक्षण धोरण राबविण्यासाठीची व्यवस्था -**

१.१ राज्य प्रशिक्षण धोरण कार्यान्वित करण्यासाठी मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य प्रशिक्षण कृती दल (State Training Task Force) स्थापन करण्यात येत असून त्यामध्ये खालीलप्रमाणे सदस्य असतील.

मुख्य सचिव - अध्यक्ष

अ.मु.स./प्र. स. (सेवा), सामान्य प्रशासन विभाग - उपाध्यक्ष

अ.मु.स./प्र. स./सचिव (प्र.सु. व र. व का.), सामान्य प्रशासन विभाग- <u>सदस्य</u>

अ.मु.स./प्र. स./सचिव, ग्राम विकास विभाग- <u>सदस्य</u>

अ.मु.स./प्र. स./सचिव, नगर विकास विभाग- <u>सदस्य</u>

अ.मु.स./प्र. स./सचिव, महसूल- <u>सदस्य</u>

अ.मु.स./प्र. स./सचिव, वित्त- <u>सदस्य</u>

अ.मु.स./प्र. स./सचिव, नियोजन- <u>सदस्य</u>

अ.मु.स./प्र. स./सचिव, सार्वजनिक आरोग्य- <u>सदस्य</u>

अ.मु.स./प्र. स./सचिव, शालेय शिक्षण- <u>सदस्य</u>

पोलिस महासंचालक- <u>सदस्य</u>

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख)- <u>सदस्य</u>

महासंचालक, यशदा - <u>सदस्य सचिव</u>

या कृती दलाची भूमिका खालीलप्रमाणे असेल व सदर दलाची बैठक अध्यक्षांच्या मान्यतेने आवश्यकतेनुसार घेण्यात येईल. सदर दलाची बैठक वर्षातून कमीत कमी दोन वेळा घेण्यात येईल.

**(अ)** राज्याच्या मानव संसाधन विकासामध्ये प्रशिक्षण धोरणाला योग्य स्थान मिळण्याबाबत प्रयत्न करणे.

**(ब)** राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेचे आधुनिकीकरण करण्याकरिता प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रोत्साहन देणे .

**(क)** राज्यातील सर्वोच्च कृतीदल म्हणून काम करताना प्रशासनातील प्रशिक्षण प्रक्रियेबाबत मूल्यमापन करुन धोरणात्मक निर्णय घेणे.

**(ड)** राज्याची प्रशिक्षण क्षमता मजबूत करण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर निधी उभारण्यासाठी प्रमुख प्रतिनिधी म्हणून काम पहाणे.

**१.२** यशदा, पुणे या प्रशिक्षण संस्थेला राज्यातील सर्व प्रशिक्षण संस्था संलग्न करण्यात येत असून यापुढे यशदा ही 'शिखर प्रशिक्षण संस्था' म्हणून कार्यरत राहील. राज्यातील प्रशिक्षण संस्थांसाठी विविध गुणवत्ता मानके निश्चित करणे, पायाभूत व बढती नंतरच्या प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम तयार करणे, विषयवस्तु (Content) बाबत मार्गदर्शन करणे, कृती संशोधनासाठी मार्गदर्शन करणे, परिणामकारक प्रशिक्षणांसाठी प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करणे, मुल्यमापन करणे इ. कामे देखील यशदा करेल.

**१.३** यशदामध्ये स्वतंत्र राज्य प्रशिक्षण नियोजन व मूल्यमापन यंत्रणा [State Training Planning & Evaluation Agency (STPEA)] स्थापन करण्यात येत असून यशदा राज्याच्या प्रशिक्षणाचे नियोजन व मूल्यमापन यांची जबाबदारी पार पाडील. सदर यंत्रणा त्रयस्थ यंत्रणा म्हणून विभागाच्या प्रशिक्षण संस्थांचे व प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांचे नियतकालीकपणे वार्षिक मूल्यमापन करेल.

**१.४** राज्यातील सर्व प्रशिक्षण संस्था प्रशिक्षण नियोजन व सनियंत्रण कक्ष [Training Planning & Monitoring Cell (TPMC)] स्थापन करतील, त्या संस्थेतील प्रशिक्षणाचे नियोजन तसेच प्रशिक्षणाच्या निविष्ठा (Input), प्रक्रिया व प्रशिक्षणाचे परिणाम यांचे सनियंत्रणाची जबाबदारी संबंधीत कक्ष सांभाळेल.

**१.५** प्रत्येक शासकीय विभाग, पंचायत राज संस्था, मंडळे व मिशन युनिट हे राज्य ते स्थानिक स्तरापर्यंत प्रत्येक कार्यालयात शक्यतो आस्थापनेवर नियंत्रण असणारा प्रशिक्षण व्यवस्थापक नेमण्याची कार्यवाही करतील. प्रशिक्षण व्यवस्थापक संबंधित विभागाच्या/ कार्यालयाच्या संबंधित स्तरासाठी कर्मचारी /अधिकारी यांच्या प्रशिक्षण समन्वयाचे काम करणे, संस्थांचे प्राथमिक सर्वेक्षण करणे, प्रत्येक योजना व कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी काही आर्थिक तरतूद आहे का ते शोधणे, विभागामध्ये प्रशिक्षण देण्याकरिता अर्थसंकल्पीय तरतूद प्राप्त करून घेण्यासाठी प्रस्ताव तयार करणे, संस्थेसाठी ५ वर्षांची प्रशिक्षण रुपरेषा व वार्षिक प्रशिक्षण आराखडा तयार करणे, प्रत्येक पदाला अनुषंगिक अशा प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण अहवाल तयार करणे आदी कामे करतील. तसेच कर्मचाऱ्यांची योग्य प्रशिक्षणासाठी निवड करणे, सेवाप्रवेश, पदोन्नती व बदलीचेवेळी, तसेच ५ ते ७ वर्षात एकदा उजळणी प्रशिक्षण मिळावे यासाठीची व्यवस्था तयार करणे व

अंमलात आणणे, प्रत्यक्षात पार पडलेल्या प्रशिक्षणाबाबत नोंद घेऊन प्रशिक्षकांशी चर्चा करुन प्रशिक्षणाचे संनियंत्रण करणे, प्रशिक्षित लोकसेवकांमधून उत्तम प्रशिक्षक शोधून त्यांचे एक दल बनविणे आणि संस्थेतील विशेष तज्ञांचे प्रशिक्षण घेऊन त्यांना प्रशिक्षण घेण्याबाबत प्रमाणित करणे. सल्लागार व तज्ञांची निवड करुन त्यांचे मार्फत हस्तपुस्तिका व प्रशिक्षण साहित्याची निर्मिती करणे तसेच ऑन दि जॉब प्रशिक्षण घेण्याचा प्रयत्न करणे, प्रशिक्षण कार्यक्रम व प्रत्यक्ष कामकाज यांचा समन्वय साधणे इ. कार्ये करतील.

**२. प्रशिक्षणाचे प्रकार -**

**२. १** राज्य शासकीय कर्मचाऱ्यांस तांत्रिक प्रशिक्षण, प्रशासनिक व सेवांतर्गत प्रशिक्षण तसेच काही विशिष्ट प्रवर्गांसाठी विदेशातील प्रशिक्षण देखील देण्यात येईल.

**२. २ तांत्रिक प्रशिक्षणाची रचना व अंमलबजावणीचा आराखडा -** सदर प्रशिक्षण संबंधित विभागाच्या आणि त्या विभागाच्या अधिनस्त संस्थांच्या मूळ तांत्रिक कामकाजाशी संबंधित असेल. तांत्रिक प्रशिक्षणाची आखणी, विकसन, नियोजन, समन्वय, अंमलबजावणी तसेच प्रशिक्षणार्थींचे मूल्यमापन करुन त्यांना प्रमाणित करण्याची जबाबदारी प्रत्येक विभाग आणि त्यांच्या अस्तित्वात असलेल्या प्रशिक्षण संस्थांची राहील. अशा संस्थांना अधिक बळकट करण्यात येऊन त्यांना स्वायत्तता व अधिकार देण्यात येईल. बदलीने नियुक्ती झ ालेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या कामाचे स्वरुपानुसार काम करण्यासाठी विशिष्ट ज्ञानाची आवश्यकता असल्यास, अशा अधिकाऱ्यांना विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील प्रशिक्षण संस्थांमध्ये सक्तीने प्रशिक्षण देणे अनिवार्य आहे. संबंधित विभागांनी तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रमासाठी वार्षिक प्रशिक्षण आराखडा करून खर्चाची तरतुद करावी.

**२. ३ प्रशासनिक व सेवांतर्गत प्रशिक्षणाची रचना तसेच अंमलबजावणीचा आराखडा -** सदर प्रशिक्षण हे ज्ञान कौशल्य व दृष्टीकोन यामधील यथायोग्य बदलासाठी राहील. हे प्रशिक्षण सर्व विभागांच्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक असेल. (लोक प्रशासन, सामाजिक बांधीलकी, प्रकल्प व्यवस्थापन, सुप्रशासन, व्यवस्थापकीय कौशल्य, अर्थसंकल्पीय बाबी, मनुष्यबळ विकास - आस्थापनाविषयक कामकाज, संबंधीत कायदे, संगणक प्रशिक्षण इ.)

सदर प्रशिक्षण, प्रशासनाची सर्वसाधारण क्षमता बांधणी, प्रेरणा व सुयोग्य कामकाजासाठी अतिशय महत्वाचे असल्याने सर्व पदांवरील कर्मचाऱ्यांना सदर प्रशिक्षण सक्तीने देण्यात यावे. या प्रशिक्षणाची

जबाबदारी शिखर प्रशिक्षण संस्था आणि प्रशिक्षणाची बांधणी, आखणी, तज्ञप्रशिक्षक तयार करणे, मूल्यमापन, परीक्षेचे वेळापत्रक ठरविणे व प्रमाणपत्रे देणे आदी कामे पहाणारी राज्य विकास संस्था म्हणून यशदाकडे व विभागिय प्रशासकिय प्रशिक्षण संस्था तसेच जिल्हा प्रशासकिय प्रशिक्षण केंद्रांकडे असेल. हे प्रशिक्षण सर्व पदांवरील कर्मचाऱ्यांना विशेषतः त्या पदावर नियुक्त झाल्यानंतर सक्तीचे असेल.

महाराष्ट्र राज्यातील सर्व संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना पुढीलप्रमाणे नमूद केलेल्या टप्प्यांवर प्रशिक्षण देण्यात येईल. कनिष्ठ स्तरावरील कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणाचा कालावधी दिवसांपेक्षा एकूण तासात ठरविणे आवश्यक राहील.

अ) **पायाभूत प्रशिक्षण कालावधी**

गट अ - सहा आठवडे, गट ब - सहा आठवडे, गट क - दोन आठवडे व गट ड - एक आठवडा

ब) **पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण कालावधी**

गट - अ दोन आठवडे, गट - ब दोन आठवडे, गट क - एक आठवडा व गट ड - तीन दिवस (२१ तास)

क) **उजळणी प्रशिक्षण कालावधी**

या प्रकारचे प्रशिक्षण किमान ५ ते ७ वर्षातून एकदा ५ दिवसांसाठी देण्यात येईल परंतु ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी सदर कालावधीत दुसरे कोणतेही प्रशिक्षण घेतले नसेल, त्याच अधिकारी व कर्मचारी यांना सदरचे प्रशिक्षण देण्यात येईल.

ड) **बदलीनंतरचे प्रशिक्षण कालावधी**

याअंतर्गत ज्या अधिकारी व कर्मचारी यांची विभागाबाहेर बदली होते तसेच बदलीनंतर त्यांच्या कामाच्या स्वरुपात बदल होतो फक्त त्याच अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येईल. या प्रशिक्षणाचा कालावधी १ ते ३ दिवसांसाठी असेल (७ ते २१ तास).

इ) **नविन विषयाची तोंडओळख प्रशिक्षण (Orientation Training)**

या प्रशिक्षणाचा कालावधी १ ते ३ दिवसांसाठी असेल (७ ते २१ तास).

वरील उजळणी प्रशिक्षण वर्ग अ व ब मधील अधिकाऱ्यांना पायाभूत प्रशिक्षणानंतर कमीतकमी ४ वर्षानंतर मात्र ६ वर्ष पूर्ण होण्यापूर्वी देण्यात यावे. नविन विषयांची तोड ओळख करण्यासाठी विशेष प्रशिक्षण आयोजीत करणे अपेक्षीत राहील.

**२. ४ विदेशातील प्रशिक्षण -** मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्य प्रशिक्षण कृती दल विशिष्ट संवर्गासाठी विदेशातील प्रशिक्षण देण्यासंबंधी धोरण ठरवेल व निर्णय घेईल.

## ३. प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यासाठीची व्यवस्था व प्रशिक्षण संस्थांची कार्ये :-

३.१ **शासकीय विभागांच्या सर्व स्तरावरील प्रशिक्षण संस्था** आवश्यकतेनुसार विभागाचा कार्यात्मक अभ्यास करतील. प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण करतील. विभागीय व व्यावसायिक परीक्षा आयोजित करतील. विभागाचे कार्यक्रम व योजना यांच्यासाठी सर्व पातळीवरील लोकांना समाविष्ट करून विशेष कार्यशाळा घेतील. विभागासाठी मॅन्युअल्स् व प्रशिक्षण साहित्य तयार करतील. विभागांच्या प्रशिक्षकांसाठी विषयानुसार प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करतील. विभागाशी संबंधित विषयात संशोधन करतील. आवश्यकते प्रमाणे विभागाचे कार्यक्रम व योजना यांचे विभाग प्रमुखांच्या वतीने मूल्यमापन करतील. त्याचप्रमाणे प्रत्येक विभागाचे बिझनेस प्रोसेस रिइंजिनिरींग करतील तसेच शासकीय धोरण, योजना व कार्यक्रमात उचित बदल आणण्यासाठी शासनाला शिफारस करतील. सदरच्या प्रशिक्षण संस्था संबंधित विभागांच्या त्या स्तरावरील विभाग प्रमुखांच्या नियंत्रणाखाली राहतील. सर्व शासकिय विभागांच्या प्रशिक्षण संस्थाचे मूल्यमापन वरिष्ठ प्रशिक्षण संस्था म्हणून यशदा करेल.

३.२ **प्रशासनिक व सेवांतर्गत प्रशिक्षणाची प्रक्रिया** ही तीन स्तरावर कार्यान्वित केली जाईल.

(अ) पहिल्या म्हणजे राज्य स्तरावर यशदा ही शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून खालीलप्रमाणे कार्य करेल.

विविध विषयांबाबत प्रशिक्षक तयार करण्याकरिता प्रशिक्षण आयोजित करणे. तसेच प्रशिक्षण व्यवस्थापकांना सखोल प्रशिक्षण देणे, संगणक व माहिती तंत्रज्ञानामध्ये विकेंद्रित प्रशिक्षण देण्यासाठी प्रमुख संस्था म्हणून काम पाहण्याखेरीज राज्य प्रायोजित संशोधनासाठी सेवासल्ला देणे. राज्य संसाधन संस्था म्हणून काम पाहणे आणि महाराष्ट्र राज्याची व्हर्च्युअल ॲकॅडमी म्हणून दुरस्थ व ई-शिक्षणासाठी राज्य यंत्रणा तसेच प्रलेख व प्रशिक्षण साहित्याची निर्मिती व प्रसारण करणे. राज्य शासनाच्या सर्व

विभागांनी तयार केलेल्या माहितीचा डाटाबेस तयार करणारी संग्रह संस्था म्हणून काम पाहणे.यशदाला प्रशासकिय अभिमत विद्यापीठाचा दर्जा देण्याबाबत आवश्यक ती पावले उचलली जातील व त्यासाठी वाढीव जमिन देण्यात येईल तसेच शासकिय योजनांचा आवश्यकतेनुसार शासनाच्या वतीने आढावा व मुल्यमापन करून आवश्यक त्या शिफारसी करण्यामध्ये व प्रशिक्षण मुल्यमापनामध्ये यशदाची मुख्य भुमिका राहील तसेच विभागाचे बिझनेस प्रोसेस रिइंजिनिअरींगचे काम हाती घेणे त्या विभागाच्या कामामध्ये कशी सुधारणा करता येईल हे प्रस्तावित करणे. व त्याचप्रमाणे विभागांना मार्गदर्शन करणे. ज्या विभागांच्या लोकांशी प्रत्यक्ष संपर्क येतो अशा विभागांसाठी हे काम प्राधान्याने घेतले जाईल.

(ब) दुस-या म्हणजे विभागीय मुख्यालयाच्या स्तरावर विभागीय प्रशासकिय प्रशिक्षण संस्था राहतील. त्यांची कार्ये / भूमिका पुढील प्रमाणे असेल.

विभागीय मुख्यालयात असलेल्या वर्ग-ब व क च्या लोकसेवासाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेणे. तसेच विशेष योजना व कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी निवडलेल्या गटाकरिता विभागवार विशेष कार्यशाळा आयोजित करणे, संबंधित विभागातील स्थानिक स्वराज्य संस्था व शासनाचे अंगीकृत व्यवसाय यांच्या प्रशिक्षण गरजा पूर्ण करण्यासाठी क्षेत्रिय संस्थांना प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करुन देणे. त्याखेरीज राज्य स्तरावर संशोधनासाठी माहिती सामुग्रीचे विकसन, यशदा व राज्यशासनाशी संपर्क साधणे व मूल्यमापन करणे.

सदरच्या प्रशिक्षण संस्था संबंधित विभागीय आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली राहतील.

(क) प्रशिक्षण प्रक्रियेचा तिसरा व अंतिम स्तर सर्व जिल्हयामधील जिल्हा प्रशासकिय प्रशिक्षण केंद्रे असतील. जिल्हा प्रशिक्षण पथक विकेंद्रित प्रशिक्षणाचे महत्वाचे काम करतील आणि त्यांची भूमिका पुढीलप्रमाणे असेल -

प्रत्येक जिल्हा प्रशासकिय प्रशिक्षण केंद्रात एक विषयतज्ञांचा गट असेल, जिल्हयाची पार्श्वभूमी व गरज लक्षात घेऊन जिल्हा केंद्रीत प्रशिक्षण विषयांची सूची निश्चित करण्यात येईल व त्याप्रमाणे जिल्हा प्रशिक्षण संस्थाची रचना करण्यात येईल. सदर गटांचे प्रशिक्षण हे यशदा, विभागीय प्रशिक्षण संस्था किंवा विविध प्रशिक्षण संस्थांमध्ये आयोजित करण्यात येईल आणि यशदाचे

प्रशिक्षणार्थींचे प्रतिनिधी व यशदा मान्यताप्राप्त प्रशिक्षक हे जिल्हा प्रशिक्षण संस्थांना मार्गदर्शन करुन या गटाच्या कामाबद्दल संबंधित प्रादेशिक संस्था व यशदा यांना अवगत करतील.

जिल्हयांतर्गत येणाऱ्या सर्व प्रशिक्षण संस्थांचे मूल्यमापन यशदा करेल. जिल्हा स्तरावरील प्रशिक्षण संस्था संबंधित जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणा खाली राहतील.

**३.३** उपरोक्त त्रिस्तरीय प्रशिक्षण संस्था टप्प्याटप्प्याने स्थापन करण्यात येतील. ज्या प्रशासकिय विभागांचे मुख्यालयाच्या ठिकाणी व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी सद्यस्थितीत प्रशासकिय प्रबोधिनी नाही तेथील सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या खात्यांच्या प्रशिक्षण संस्था, विद्यापिठ अन्य स्वायत्त संस्था किंवा खाजगी संस्था यांना प्रशासकिय प्रशिक्षण संस्था म्हणून तात्पुरता किंवा कायम दर्जा देणे व तात्पुरता दर्जा दिलेल्या संस्थांच्या जागी प्रथम टप्प्याटप्प्याने स्वतंत्र प्रशासकिय प्रशिक्षण संस्था स्थापन केल्या जातील. संबंधित संस्थांना शासन जागा उपलब्ध करून देईल व लागणारी आर्थिक तरतूद सामान्य प्रशासन विभाग करेल. व त्यापुढील कालावधीत सर्व खात्यांसाठी प्रशिक्षण संस्था टप्प्याटप्प्याने स्थापन केल्या जातील. संबंधित संस्थांना शासन जागा उपलब्ध करून देईल व लागणारी आर्थिक तरतूद संबंधीत विभाग करेल.

**३.४** राज्यातील सर्व प्रशिक्षण संस्थांनी सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० अंतर्गत किंवा मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अंतर्गत नोंदणी करून स्वायत्तता देण्यात येईल. प्रशिक्षणाची गुणवत्ता राखण्यासाठी सर्व स्वायत्त प्रशिक्षण संस्थांच्या नियामक मंडळावर व कार्यकारी मंडळावर <u>शासन व यशदाचे प्रतिनिधीत्व राहील</u>. या संस्थांना शासनाकडून अनुदान देण्यात येईल. मात्र अशा संस्थांनी खर्चात काटकसर तसेच प्रायोजित प्रशिक्षण कार्यक्रम, प्रकल्प व सल्ला सेवा यामधून निधी उभारण्यासाठी प्रयत्नशील राहावे असे करणे आवश्यक राहील.

**३.५** राज्य शिखर प्रशिक्षण संस्थेने व खात्यांच्या राज्यस्तरीय संस्थांनी केवळ प्रशिक्षण संस्था म्हणून नव्हे तर महत्वाचे संसाधन केंद्र, थिंक टँक, प्रशासकिय व विभागाच्या कार्यांशी संबंधीत संशोधन व प्रलेखन केंद्र , तंत्रज्ञान विस्तार केंद्र, शासनाच्या योजनांचे मुल्यमापन यंत्रणा, खात्यांच्या बिझनेस रिइंजीनिरींग करणाऱ्या संस्था तसेच संकलीत तथ्यांच्या अधारावर अभ्यासपुर्वक ध्येय धोरणे सुचविणाऱ्या संस्था म्हणून कार्यरत व्हाव्यात असेही अभिप्रेत आहे. विभागिय स्तरावरील प्रशासकिय / खात्यांच्या प्रशिक्षण संस्था तसेच जिल्हा स्तरावरील

प्रशासकिय / खात्यांच्या प्रशिक्षण संस्था या कामात राज्य शिखर प्रशिक्षण संस्था व खात्यांच्या राज्यस्तरीय संस्थांना मदत करतील.

## ४. दूरस्थ प्रशिक्षण प्रणाली :-

यशदा ही राज्य विकास संस्था व दृकश्राव्य अकादमी म्हणून संबंधित विभागाच्या प्रशिक्षण संस्थांमार्फत प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करेल. गट अ, ब व क साठी प्रशिक्षण अनिवार्य करण्याचे प्रस्तावित असल्यामुळे पारंपारिक/सामान्य प्रशिक्षण घेणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या फार मोठया प्रमाणात रहाणार आहे. सबब दूरस्थ प्रशिक्षण प्रणाली परिणामकारक राहील. या प्रयोजनार्थ प्रादेशिक व जिल्हास्तरावरील प्रशिक्षण संस्थांचा दूरस्थ केंद्रे म्हणून दृकश्राव्य (Video Conferencing) परिसंवाद, संगणकाद्वारे प्रशिक्षण, संगणकाद्वारे मुल्यमापन व संगणकाद्वारे प्रमाणपत्रे देणे इ. साठी वापर करता येईल. या केंद्रांपर्यंत पोहोचण्यासाठी यशदा ही संस्था Virtual Academy म्हणून काम पाहील.

## ५. प्रशिक्षणाशी संबंधीत मनुष्यबळ :-

**५.१** प्रशिक्षणात गुणवत्ता राखण्यासाठी सर्व विभागांनी प्रशिक्षणासंबंधित मनुष्यबळाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक ठरेल. या अंतर्गत नियमित प्रशिक्षक व प्रतिनियुक्तीवरील प्रशिक्षक या पदांसाठी लागणारी अभिक्षमता व क्षमता असणाऱ्या व्यक्तीची निवड होण्याच्या दृष्टीने विशिष्ट चाळणी प्रक्रिया व योग्य प्रेरणा देणारे लाभ निश्चित करावे. ज्यामुळे एम. फिल, पी.एचडी, सेट, नेट व प्रशिक्षण अनुभव असणारे व्यक्ती नियमित प्रशिक्षक होण्यास इच्छूक राहतील व योग्य शासकीय अधिकारी प्रतिनियुक्तीवर या सेवांकडे आकर्षित होतील. प्रशिक्षणात सातत्य राखण्यासाठी प्रशिक्षण संस्थाना २५% पर्यंत नियमित प्रशिक्षक नियुक्त करण्यास उद्युक्त करावे व २५% साठी प्रत्यक्ष क्षेत्रावरील अनुभव असणारे प्रतिनियुक्ती वरील प्रशिक्षक आणि उर्वरित ५०% गरजा बाहेरील प्रशिक्षकांव्दारे पुर्ण करण्यात याव्यात. ज्यामध्ये सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचा, करारावरील प्रशिक्षकांचा तसेच पाहुणे प्रशिक्षक यांचा समावेश असेल. त्याचप्रमाणे प्रशिक्षण संस्थांना नियतकालीकपणे प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षक विकास कार्यक्रम आयोजित करण्याबाबत व प्रशासकिय संशोधन करण्यासाठी

देशांतर्गत व देशाबाहेर संधी तसेच शैक्षणिक पात्रता वाढीसाठी रजा उपलब्ध करून देण्यास प्रोत्साहन देण्यात यावे.

**५.२** प्रशिक्षण संस्थांकडे प्रतिनियुक्तीवर येणाऱ्या प्रशिक्षकांसाठी मूळ वेतनाच्या ३० टक्के प्रशिक्षण भत्ता अनुज्ञेय राहील. मात्र अशा प्रशिक्षकांना प्रतिनियुक्ती भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

## ६. अधिकारी / कर्मचारी प्रशिक्षण व सेवा नियमांची सांगड :-

प्रशिक्षणाला जाणीवपूर्वक कर्मचाऱ्यांच्या व अधिकाऱ्यांच्या व्यावसायिक प्रगती बरोबर जोडले जाणे आवश्यक आहे. त्यामुळे एखादा अधिकारी / कर्मचारी पायाभूत प्रशिक्षण जोपर्यंत पूर्ण करत नाही तोपर्यंत त्यांना नियमित पदस्थापना न देता परिविक्षाधीन अधिकारी मानण्यात यावे. प्रत्येक ५ ते ७ वर्षाच्या गटात किमान पाच दिवसांचे एक प्रशिक्षण होणे पदोन्नतीसाठी आवश्यक आहे. दरवर्षी वेतनवाढ देताना त्या कर्मचाऱ्यांचे आवश्यक ते प्रशिक्षण पुर्ण केले किंवा कसे याची तपासणी करणे आवश्यक राहील.

वरीष्ठाद्वारे प्रशिक्षणासाठी नामनिर्देशन होऊन सुध्दा संबंधीत व्यक्ती अपवादात्मक परिस्थिती वगळता गैरहजर राहिली तसेच सुट मिळण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडून मान्यता न घेतल्यास म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडून शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी. तसेच संबंधीत प्रशिक्षणासाठी एका प्रशिक्षणार्थीला येणारा खर्च त्या व्यक्तीच्या पगारातून कपात करून संबंधीत प्रशिक्षण संस्थेच्या खात्यावर वसुली म्हणून वरीष्ठाद्वारे जमा करुन या वसुलीची नोंद त्या व्यक्तीच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी. प्रशिक्षण विषयक उपरोक्त उल्लेखित बंधनकारक बाबींचा यथावकाश सेवा नियमांमध्ये समावेश करणे संबंधित विभागांना आवश्यक राहील. प्रत्येक प्रशिक्षणाच्या शेवटी प्रशिक्षणार्थींचे मुल्यमापन करणे आणि त्यांची यशस्विता प्रमाणित करणे अनिवार्य राहील व ज्या प्रशिक्षणार्थ्यांना विहीत गुण मिळणार नाहीत त्यांना स्वखर्चाने ते प्रशिक्षण पुन्हा करावे लागेल. तसेच प्रत्येक प्रशिक्षकाबाबत, एकूण प्रशिक्षणाबाबत, रहाण्याच्या व इतर सोयी सुविधांबाबत प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी प्रशिक्षणार्थींकडून मुल्यमापन करुन घेण्यासाठी Feedback System चालू करण्यात येईल.

दिर्घ कालावधीचे व विदेशी प्रशिक्षणापुर्वी प्रशिक्षणार्थीला सक्षम प्राधिकाऱ्याबरोबर बंधपत्र लिहून दयावे लागेल व त्याप्रमाणे नंतर प्रशिक्षणार्थी नोकरी सोडत असेल तर प्रशिक्षणावर खर्च झालेली रक्कम सदर

प्रशिक्षणार्थीकडून वसूल करून संबंधित प्राधिकाऱ्याला शासनाकडे जमा करावी लागेल. देश विदेशातील विशेष प्रशिक्षण, निरंतर शिक्षण व संशोधन संधी यासाठी उपरोल्लेखीत संबंधीत प्रशिक्षण पूर्ण करणे अनिवार्य राहील.

प्रशिक्षण संस्थांनी नामनिर्देशन मागविले असतांना आपत्ती, निवडणूक, जनगणना, कायदा व सुव्यवस्था या परिस्थितीव्यतीरिक्त विभागाने नामनिर्देशन न केल्यास तसेच सुट मिळण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडून (सक्षम प्राधिकारी म्हणजे त्या त्या विभाग / कार्यालयाचे वरिष्ठ कार्यालय असेल) मान्यता न घेतल्यास सक्षम प्रधिकाऱ्याकडून संबंधीत अधिकाऱ्यावर म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या तरतुदीनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या अध्ययन रजेसाठी (Study Leave) काय धोरण असावे याबाबत राज्य प्रशिक्षण कृतिदल (STTF) यांना शिफारस करण्याचे अधिकार रहातील.

**७. लोकप्रतिनिधींचे प्रशिक्षण**

पंचायत राज संस्थांचे प्रतिनिधी, आमदार आणि मंत्रीगण यांचे देखील प्रशिक्षण संबंधीत स्तरावरील प्रशिक्षण संस्थांना आयोजित करणे आवश्यक राहील. विस्तृत आदेश वेळोवेळी निर्गमित केले जातील.

**८. आर्थिक तरतुद :-**

प्रत्येक शासकिय विभाग वर्षाच्या सुरवातीला प्रशिक्षण आराखडा तयार करेल व त्यानुसार त्या आर्थिक वर्षाच्या त्या शासकिय विभागाच्या अर्थसंकल्पात आवश्यक तरतुद करेल. राज्य प्रशिक्षण नियोजन व मूल्यमापन यंत्रणेसाठी लागणारी आर्थिक तरतूद तसेच प्रशासनिक व सेवांतर्गत प्रशिक्षण आणि प्रशिक्षणार्थींच्या परीक्षा / प्रमाणपत्रे यासाठीची यशदास व विभागिय प्रशासकिय प्रशिक्षण संस्था तसेच जिल्हा प्रशासकिय प्रशिक्षण केंद्रासाठी लागणारी आर्थिक तरतूद त्या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात सामान्य प्रशासन विभागामार्फत करण्यात येईल. सदर प्रशिक्षण धोरण योजना ही योजनांतर्गत योजना म्हणून राबविण्यात येईल.

९. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०११०९२३१६२९३५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रत्नाकर गायकवाड)
मुख्य सचिव